1 8 MAR 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**संशोधनाला बळ :** दक्षिण कोरियात आधुनिक तंत्रज्ञानाच्या संशोधनास होणार मदत

# शिवाजी विद्यापीठाचा म्यॉंगजीशी सामंजस्य करार

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि दक्षिण कोरियातील म्यॉंगजी विद्यापीठ यांच्यात गुरुवारी सामंजस्य करार करण्यात आला. शैक्षणिक, संशोधन क्षेत्रांतील संबंध अधिक बळकट करण्यासह, दोन्ही विद्यापीठांनी परस्पर सहकार्य वाढविण्यासाठी हा करार केला आहे.

विद्यापीठाच्या नॅनो सायन्स आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या सभागृहात या करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि म्यॉंगजी विद्यापीठातर्फे प्रा. डॉ. जिआँग गिल सिओ यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी नॅनो सायन्स व तंत्रज्ञान अधिविभागाचे समन्वयक प्रा. डॉ. पी. एस पाटील, संख्याशास्त्र अधिविभागाचे प्रा. डॉ. डी. टी. शिर्के, आंतरराष्ट्रीय संबंध कक्षाचे समन्वयक ए. व्ही. घुले उपस्थित होते. कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, या करारामुळे दक्षिण कोरिया आणि शिवाजी विद्यापीठाचे संबंध आणखी दृढ होण्यास मदत होईल. डॉ. सिओ म्हणाले, शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी दक्षिण कोरियात उत्तम संशोधकीय योगदान देत असून, या कराराच्या माध्यमातून सहकार्यवृद्धी होत आहे. डॉ. एस. डी. जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. ए. पी. तिवारी यांनी आभार मानले. (प्रतिनिधी)



शिवाजी विद्यापीठ आणि दक्षिण कोरियातील म्यॉंगजी विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार गुरुवारी करण्यात आला. या करारावर कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आणि म्यॉंगजी विद्यापीठातर्फे प्रा. डॉ. जिआँग गिल सिओ यांनी स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी डावीकडून ए. व्ही. घुले, डी. टी. शिर्के, पी. एस. पाटील उपस्थित होते.

### कोरियन, हिंदी भाषा केंद्रांची आवश्यकता

सामंजस्य करारात विद्यापीठातील विद्यार्थ्यांचे आदान प्रदान, संशोधन क्षेत्रात सहकार्य तसेच आर्थिक साहाय्य या बाबींचा समावेश असल्याचे डॉ. पाटील यांनी सांगितले. येथे 'कोरियन भाषा केंद्र' म्यॉंगजी तसेच इतर कोरियन विद्यापीठांत 'हिंदी भाषा केंद्र' स्थापन करण्याची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

18 MAR 2017 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज अभियांत्रिकी, उद्योग कौशल्यावर चर्चा

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान विभागाच्या वतीने शनिवारी शाहू सिनेट हॉलमध्ये 'एच. आर. मिट २०१७' (मनुष्यबळ व्यवस्थापन परिषद २०१७) आयोजित केली आहे. या कार्यक्रमासाठी नामवंत कंपन्याच्या एच. आर. विभागातील अधिकारी उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत अभियांत्रिकी विद्यार्थी आणि उद्योग जगत, विविध विषयांची माहिती, तसेच विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीसाठी लागणारे मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

प्रत्येक हाताला काम आणि कामाचे योग्य दाम व त्या परिश्रमाच्या दामाद्वारे सरल, सुलभ जीवनमान कसे जगता येईल असे धोरण. एकीकडे उंच इमारती, मॉल, वाढणारी लोकसंख्या, संगणकीकरण, आधुनिकीकरण त्यामुळे करोडोचे मनुष्यबळ पोट भरण्यासाठी शहराकडे धाव घेऊ लागले आहेत. असे असताना उपलब्ध रोजगार, मनुष्यबळाच्या व्यस्त प्रमाणात लोकांना नोकरी आणि उर्वरित लोक नोकरीच्या शोधात आहेत. अशा प्रचंड मनुष्यबळ व त्यांचे व्यवस्थापन, हजारोंच्या संख्येने अभियांत्रिकी महाविद्यालये आणि लाखोंच्या संख्येने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या भावितव्याचा विचार, व मार्गदर्शन या कार्यक्रमाद्वारे मिळणार आहे.

भारतात गुंतवणूक करण्यासाठी जगभरातील उद्योगसंस्था पसंती दर्शवत आहेत. जवळपास ६०० औद्योगीक कंपन्यांनी भारतामध्ये २७० लाख कोटी रुपयांचे प्रस्ताव समोर केले आहेत. त्यामुळे विदेशी गुंतवणुकीमध्ये जगात भारत क्रमांक एक वर आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे भारत सरकार अधिकाधिक रोजगार निर्माण व्हावेत, तरुणांच्या हाताला काम मिळावे यासाठी अनेक सरकारी योजनांची निर्मिती व अंमलबजावणी करत आहे. त्यामध्ये तांत्रिक कौशल्य, संवाद कौशल्य, व्यावसायिक नीतीमूल्ये या विषयांवर मान्यवरांकडून मार्गदर्शन मिळणार आहे. तसेच परिसंवादात उद्योगजगत व शिक्षणजगत यांच्यातील तफावत व दरी या विषयी मार्गदर्शन मिळणार आहे, अशी माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ.जयदीप बागी यांनी दिली.

**अभियांत्रिकी आणि उद्योग जगतातील कौशल्यावर होणार सखोल चर्चा**

**या परिषदेत सहभागी होणाऱ्या कंपन्या**

मर्सिडिज बेंझ रिसर्च अँड डेव्हलमेंट इंडिया, पुणे, टाटा कम्युनिकेशन लिमिटेड, टाटा ॲटो कॉंप सिस्टीम लिमिटेड, टेक–महिंद्रा, सिमेन्स, टी–कॉग्निशन, रिलायन्स इंडस्ट्रिज, इमर्सन क्लायमेंट टेक्नॉलॉजीस्, ओरॅकल इंडिया लिमिटेड, सीड इन्फोटेक, सीगेट टेक्नॉलॉजीस् लिमिटेड, एक्सेल इंडस्ट्रिज लिमिटेड, प्राज इंडस्ट्रिज लिमिटेड, इंजेनेरो टेक्नॉलॉजीस् इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, सुर्थ ऑरगॅनिक लिमिटेड, कॅडबरी इंडिया लिमिटेड, गोकुळ डेअरी, कोल्हापूर, लव्हासा पुणे, कोमाऊ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, गद्रे मरिन एक्सपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड, डोल्हर इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, ब्लॅक अँड वेच इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, विनंती ऑरगॅनिक्स लिमिटेड, देसाई ब्रदर्स प्रायव्हेट लिमिटेड, ग्लोबल गुरमित प्रायव्हेट लिमिटेड.

18 MAR 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागात आज 'एच आर मीट-२०१७'

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीच्या वतीने दि. १८ मार्च २०१७ रोजी शाहू सिनेट हॉल येथे 'एच आर मीट २०१७' आयोजित केली आहे. या कार्यक्रमासाठी नामवंत कंपन्यांचे एच. आर. उपस्थित राहणार असून अभियांत्रिकी विद्यार्थी आणि उद्योग जगत या संदर्भात तसेच विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीसाठी लागणारे मार्गदर्शन केले जाणार आहे. आगामी दोन-तीन वर्षांमध्ये भारतात गुंतवणूक करण्यासाठी जगभरातील उद्योगपती पसंती दर्शवत आहेत. जवळपास ६०० औद्योगिक कंपन्यांनी भारतामध्ये २७० लाख कोटी रुपयांचे प्रस्ताव सादर केले आहेत. त्यामुळे विदेशी गुंतवणुकीमध्ये जगात भारत क्रमांक एकवर आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भारत सरकार अधिकाधिक रोजगार निर्माण व्हावेत. आणि तरुणांच्या हाताला काम मिळावे, यासाठी बऱ्याच सरकारी योजनांची निर्मिती व अंमलबजावणी करत आहे. याबाबतचे स्किल विद्यार्थ्यांना अंगिकारता यावेत, या उद्देशाने हा कार्यक्रम उपयोगी ठरणार आहे.

# शिवाजी विद्यापीठात रंगपंचमीची धूम

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठात शुक्रवारी रंगपंचमीची धूम दिसून आली. युवक-युवतींनी कॅम्पसबाहेर रंगाची उधळण करत रंगांचा उत्सव साजरा केला. सर्वच विद्यार्थ्यांनी पाणी बचतीचा संदेश देत कोरड्या रंगाने रंगपंचमी साजरी केली. प्रत्येक वसतिगृहातही रंगपंचमीचा माहौल दिसून आला. परीक्षेच्या काळातील धावपळीत रंगपंचमीच्या निमित्ताने विद्यार्थी रिफ्रेश झाल्याचे दिसत होते.

18 MAR 2017
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आज 'एच आर मिट'

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात तंत्रज्ञान अधिविभागातर्फे आज, शनिवारी सकाळी दहा वाजता 'एच आर मीट' हा कार्यक्रम होणार आहे. विद्यापीठातील राजर्षी शाहू सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात विविध कंपन्यांचे मनुष्यबळ विकास विभागाचे प्रमुख सहभागी होणार आहेत.

अभियांत्रिकीचे विद्यार्थी आणि उद्योग जगत, विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीसाठी लागणारे मार्गदर्शन, आदी विविध विषयांबाबत चर्चा होणार आहे.

विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे, अशी माहिती तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जयदीप बागी यांनी दिली. (प्रतिनिधी)

जनसंपर्क कक्ष
1 8 MAR 2017 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आज एच. आर. मीट

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजीतर्फे उद्या (ता. १८) शाहू सिनेट हॉलमध्ये एच. आर. मीट होत आहे. कार्यक्रमासाठी नामवंत कंपन्यांचे एच. आर. उपस्थित राहणार असून, अभियांत्रिकी विद्यार्थी आणि उद्योगजगत यासंदर्भात, तसेच विद्यार्थ्यांमधील कौशल्यवाढीसाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.